# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय,
## शस्त्रविरोधी पथक, गुन्हेशाखा.

**प्रेसनोट ता. २८/०७/२०२२**

**खुनाच्या गुन्हयातील पॅरोल वर फरारी असलेल्या आरोपी कडुन जप्त केले चार देशी बनावटीचे पिस्टल व काडतुसे - शस्त्रविरोधी पथकाची कामगिरी**

---

दिनांक २७/०७/२०२२ रोजी **पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे, पोलीस उप-निरीक्षक बी.आर.गोसावी, पो.हवा/५०६ चंद्रकांत गवारी, पो.कॉ./१५९७ प्रविण मुळुक, पो.कॉ./२३८२ सागर शेळके शस्त्रविरोधी पथक, गुन्हे शाखा असे खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना पो.कॉ./१५९७ प्रविण मुळुक** यांना त्यांचे गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली कि, "महाराजा टि स्टॉल जवळ, इंद्रायणीनगर, एम.आय.डी.सी. भोसरी, पुणे येथे एक इसम हा त्याचे पाठीवरील निळे रंगाचे बॅगमध्ये पिस्टल विक्री करण्यासाठी येणार आहे." अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदर पथकाने सापाळा लावुन थांबले असता इसम नामे **वेदांत विलास माने वय-२५ वर्षे, रा.साईधाम हॉस्पीटल मागे, लांडेवाडी, भोसरी, पुणे** हा सदर ठिकाणी आला असता त्यास पोलीसांचा संशय आल्याने तो पळुन जावु लागल्याने त्यास पथकातील पोलीसांनी पाठलाग करुन पकडले त्यावेळी त्याची पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला एक पिस्टल लावलेले आढळुन आले व त्याचे पाठीवरील बॅग तपासली असता त्यामध्ये तिन देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत काडतुसे मिळुन आली. या प्रमाणे सदर आरोपी कडे एकुण **चार पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा एकुण १०२१००/-रु** मुद्देमाल मिळुन आला. आरोपीची अधिक चौकशी केली असता सदर आरोपी हा भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ३९६/२०१६ भा.द.वि. कलम ३०२ मधील पॅरोलवर फरार असल्याचे आढळुन आले. आरोपीने सदर पिस्टल हे मध्यप्रदेश येथुन विक्री साठी आणल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे विरुध्द एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ४४७/२०२२ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(२) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त **श्री अंकुश शिंदे सो**., अपर पोलीस आयुक्त **श्री डॉ.संजय शिंदे सो, श्री काकासाहेब डोळे सो**., पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहा. पोलीस आयुक्त **प्रशांत अमृतकर सो**, सहा पोलीस आयुक्त **पद्माकर घनवट सो**, पिंपरी चिंचवड

यांचे मार्गदर्शनाखाली शस्त्र विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक **राजेद्र निकाळजे,** पोलीस उप-निरीक्षक **बी.आर.गोसावी,** सहा.फौ./शिंदे, सहा.फौ./वाव्हळे, पो.हवा./५०६ गवारी, पोलीस हवा.६४६ प्रितम वाघ, पो.हवा./९०१ शेख, पो.कॉ./१५९७ मुळुक, पो.कॉ/२१८४ आत्तार, पो.कॉ./२३८२ शेळके, पो.हवा/६६९ माळी, तांत्रीक विश्लेषन विभाग यांचे पथकाने केली असुन पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक **बी.आर.गोसावी** व एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे करीत आहे.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,गुन्हेशाखा,
पिंपरी-चिंचवड आयुक्तालय